Shri Shahu Chhatrapati Shikshan Sanstha's
Shri Shahaji Chhatrapati Mahavidyalaya, Kolhapur's

# SHAHAJI BULLETIN
(शहाजी वार्तापत्र)

E-mail : sscm34.cl@unishivaji.ac.in • प्रेरणा : मा. श्री. मानसिंग बोंद्रे, चेअरमन, श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्था, मा. श्री. विजयराव बोंद्रे, मानद सचिव, श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्था

• संपादक : प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण • कार्यकारी संपादक : डॉ. सुरेश शिखरे • सहसंपादक : डॉ. पी. बी. पाटील, प्रा. पी. के. पाटील • वर्ष पहिले अंक दुसरा (एप्रिल/मे/जून २०१८)



## थोडं मनांतलं...!

मित्रहो,

'शहाजी वार्ता'चा दुसरा अंक आपल्या हाती देताना मनस्वी आनंद होत आहे. पहिल्या अंकामध्ये श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्था, राजर्षी छत्रपती शाहू महाराज, श्री शहाजी छत्रपती महाराज यांसह महाविद्यालय व परिसराची माहिती संस्थेच्या सर्व घटकांसमोर ठेवण्यात आली. पहिल्या अंकाचे प्रकाशन मा. सौ. मधुरिमाराजे छत्रपती, संस्थेचे चेअरमन मा. श्री. मानसिंग बोंद्रे, मानद सचिव मा. श्री. विजयराव बोंद्रे, शिवाजी विद्यापीठाचे शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे यांच्यासह महाविद्यालयाचे प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी यांच्या उपस्थितीत संपन्न झाले. या अंकाचे सर्वांनी कौतुक केले. विशेषत: चेअरमनसो। व मानद सचिवसो। यांनी कौतुक करताना, प्रोत्साहनही दिले.

'शहाजी वार्ता'मध्ये प्रत्येक तीन महिन्यातील घटना, प्रसंगांचा वेध घेण्याचा प्रयत्न असणार आहे. प्रस्तुत अंकामध्ये एप्रिल, मे आणि जून महिन्यामधील विविध उल्लेखनीय कार्यवृत्तांत समाविष्ट आहे. विशेषत: अकरावी निकाल, बारावी परीक्षेतील यश आणि विद्यापीठ स्तरावरील बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी. परीक्षेतील लक्षणीय यशाची आवर्जून नोंद घेतली आहे. विद्यार्थ्यांच्या छायाचित्रासह मजकूर प्रसिद्ध केल्यामुळे सध्या शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसमोर आदर्श निर्माण होईल अशी आमची धारणा आहे.

गेल्या तीन महिन्याच्या काळात अनेक नव-नवीन उपक्रम सुरू झाले असून बारावीसाठी विशेष गुणवत्ता वर्गाचे आयोजन करण्यात आले आहे. कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व शिक्षक या प्रक्रियेमध्ये सहभागी आहेत. अतिरिक्त तास, सराव चाचणी परीक्षा यासह चर्चा, संवाद, समुपदेशन अशा स्तरावर ही प्रक्रिया असणार आहे. या शैक्षणिक वर्षापासून बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी. कडे विशेष लक्ष देण्याचा मानस आहे. या शाखांकडे कर्तव्य बजावणारे सर्व प्राध्यापक, कर्मचारी प्रामाणिक व कामसू असून त्यांच्या सहकार्याने नवनवीन उपक्रम सुरू करता येतील. याचा 'नॅक'च्या प्रक्रियेत निश्चितच फायदा होईल.

वरिष्ठ व कनिष्ठ प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. या वर्षी माहितीपत्रक व प्रवेश फॉर्म रचनेत बदल केला असून प्रवेशासाठी नेहमीप्रमाणे खूप चांगला प्रतिसाद आहे. या वर्षी विद्यार्थ्यांच्या उपस्थितीकडे गांभीर्याने लक्ष देण्यात येणार असून संपूर्ण वर्षभर विद्यार्थी ज्ञानार्जनाच्या प्रक्रियेत सहभागी व्हावा यासाठी नियोजनबद्ध कार्यक्रम 'अॅकॅडेमिक कॅलेंडर'च्या माध्यमातून तयार केला आहे. या शैक्षणिक वर्षामध्ये राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय चर्चासत्रांसह विविध विषयांच्या कार्यशाळांचे आयोजन करण्याचा मानस आहे. त्याचबरोबर विद्यार्थीनींच्या व्यक्तिमत्व विकासाच्या दृष्टिने व्याख्याने, कार्यशाळा व प्रात्यक्षिकांचेही आयोजन करण्यात येणार आहे.

एका बाबीचा उल्लेख मनाला सुखावणारा आहे. आपल्या महाविद्यालयातील आजी माजी प्राध्यापक व माजी विद्यार्थी जे आपल्या महाविद्यालयामध्ये प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत त्यांनी महाविद्यालयीन विकास प्रक्रियेमध्ये वेळोवेळी सक्रिय योगदान दिले आहे. या वर्षाच्या सुरूवातीला त्यांनी विविध विषयांसाठी पारितोषिके सुरू करण्यासाठी भरीव स्वरूपाची आर्थिक तरतूद ठेवीच्या स्वरूपात महाविद्यालयाकडे सुपूर्त केली आहे. या सर्वांचे मनापासून आभार!

'शहाजी वार्ता' हा आपल्या महाविद्यालयाचा अभिनव उपक्रम आहे. या उपक्रमाचे स्वागत आपल्याकडून होत राहील अशी आशा आहे.

**- प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण**



'शहाजी वार्तापत्र' प्रकाशन प्रसंगी मा. सौ. मधुरिमाराजे छत्रपती, चेअरमन मा. श्री. मानसिंग बोंद्रे, मानद सचिव मा. श्री. विजयराव बोंद्रे, माजी प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे, प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण व उपस्थित मान्यवर

## 'शहाजी वार्तापत्र' महाविद्यालयाचा आरसा

**- श्री. मानसिंग बोंद्रे**

श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये महाविद्यालयातील विविध उपक्रम विद्यार्थी-पालक यांच्यापर्यंत पोहचविण्यासाठी 'शहाजी वार्तापत्र' (त्रैमासिक) हा अनोखा उपक्रम सुरू करण्यात आला. शहाजी वार्तापत्राच्या प्रथम अंकाचा प्रकाशन सोहळा मा. मधुरिमाराजे छत्रपती यांच्या शुभहस्ते बुधवार दि. ४ एप्रिल २०१८ रोजी संस्थेचे चेअरमन मा. श्री. मानसिंग बोंद्रे, मानद सचिव मा. श्री. विजयराव बोंद्रे, शिवाजी विद्यापीठाचे शैक्षणिक सल्लागार प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे यांच्या उपस्थितीत व प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. याप्रसंगी श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेचे चेअरमन श्री. मानसिंग बोंद्रे यांनी 'शहाजी वार्तापत्रा'चे कौतुक करून, शहाजी वार्तापत्र म्हणजे महाविद्यालयाचा आरसाच आहे, असे प्रतिपादन केले. वार्तापत्रामुळे विद्यार्थी-पालकांपर्यंत महाविद्यालयातील घडामोडी, उपक्रम इ. पोहचणे शक्य होईल. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यकारी संपादक डॉ. डी. के. वळवी यांनी केले. तर शहाजी वार्तापत्र सुरू करण्याची संकल्पना व भूमिका प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण यांनी मांडली. या प्रसंगी ज्येष्ठ उद्योगपती श्री. बाळासाहेब कडोलकर, के.एम.सी. कॉलेजचे प्राचार्य डॉ. सुरेश गवळी, ज्येष्ठ सिने दिग्दर्शक श्री. यशवंत भालकर, डॉ. सुरेश शिखरे, प्रबंधक रवींद्र भोसले, अधिक्षक मनिष भोसले व प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## 'युगांतर' नवोदित कवी, लेखक, साहित्यिक विद्यार्थ्यांना उत्तम व्यासपीठ


**- श्री. विजयराव बोंद्रे**



शहाजी महाविद्यालयाच्या 'युगांतर-२०१८' नियतकालिकाचे प्रकाशन करताना संस्थेचे मानद सचिव श्री. विजयराव बोंद्रे, प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण, संपादक प्रा. एस. डी. अपराध, डॉ. डी. के. वळवी, डॉ. यु. बी. मुजुमदार, प्रबंधक श्री. रवींद्र भोसले व उपस्थित मान्यवर

श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयाच्या वतीने चालविल्या जाणाऱ्या 'युगांतर' (२०१७-१८) या नियतकालिकाचे प्रकाशन श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेचे मानद सचिव मा. श्री. विजयराव बोंद्रे यांच्या हस्ते व प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. या प्रसंगी श्री. विजयराव बोंद्रे यांनी 'युगांतर'च्या संपादक मंडळाने अत्यंत मेहनतीने केलेल्या या दर्जेदार अंकामुळे महाविद्यालयातील नवोदित कवि, लेखक, साहित्यिक विद्यार्थ्यांना उत्तम व्यासपीठ उपलब्ध करून दिलेले आहे. शिवाजी विद्यापीठामार्फत घेतल्या जाणाऱ्या नियतकालिक स्पर्धेत या अंकातील लेखांच्या साहित्यमूल्यांची निश्चितच दखल घेण्यात येईल असे प्रतिपादन श्री. बोंद्रे यांनी व्यक्त केले. या प्रसंगी श्री. प्रविण भोसले, डॉ. यु. बी. मुजुमदार, डॉ. डी. के. वळवी, डॉ. राहुल मांडणीकर, डॉ. सुरेश शिखरे, डॉ. शिवाजी जाधव, 'युगांतर'चे संपादक प्रा. सदानंद अपराध, प्रबंधक श्री. रवींद्र भोसले, अधिक्षक श्री. मनिष भोसले व महाविद्यालयातील प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी उपस्थित होते.

## कोल्हापूरच्या विकासात श्री शहाजी छत्रपती महाराजांचे मोठे योगदान : मधुरिमाराजे



श्री शहाजी छत्रपती महाराज जयंती कार्यक्रमप्रसंगी मनोगत व्यक्त करताना मा. सौ. मधुरिमाराजे छत्रपती, सोबत चेअरमन मा. श्री. मानसिंग बोंद्रे, मानद सचिव मा. श्री. विजयराव बोंद्रे, माजी प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे, प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण व उपस्थित मान्यवर

श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेच्या श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयात श्री शहाजी छत्रपती महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून सौ. मधुरिमाराजे छत्रपती उपस्थित होत्या. संस्थेचे चेअरमन श्री. मानसिंग बोंद्रे, मानद सचिव श्री. विजयराव बोंद्रे, प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण यांच्या प्रमुख उपस्थितीत व शिवाजी विद्यापीठाचे शैक्षणिक सल्लागार प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. या प्रसंगी सौ. मधुरिमाराजे छत्रपती यांनी राजर्षी शाहू महाराजांचे कार्य जोमाने पुढे नेण्याचा प्रयत्न केला. कोल्हापूर संस्थानात व जिल्ह्याच्या विकासात श्री शहाजी महाराजांचे मोठे योगदान आहे, त्यांच्या योगदानामुळेच कोल्हापूरात कृषी, उद्योग, शिक्षण, क्रीडा यासह विविध क्षेत्रातील विकासाला गती मिळाली, असे प्रतिपादन सौ. मधुरिमाराजे छत्रपती यांनी केले. या कार्यक्रमाच्या निमित्ताने डॉ. सुरेश शिखरे यांचे 'श्री शहाजी महाराजांचे जीवन व कार्य' या विषयावर व्याख्यान झाले. स्वागत प्रा. पी. के. पाटील यांनी केले व आभार डॉ. पांडुरंग पाटील यांनी मानले. या प्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दैनंदिन जीवनात योगधारणा उपयुक्त

**- प्राचार्य डॉ. शानेदिवाण**

श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय व ५ महाराष्ट्र बटालियन एन.सी.सी. ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक योग दिनाचे औचित्य साधून १५ दिवसाच्या योग प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आलेले होते. या प्रसंगी, दैनंदिन जीवनात मानवास योगधारणा अतिशय उपयुक्त आहे, शैक्षणिक दृष्ट्या आपल्या जीवनात योग, ध्यानधारणा इत्यादीला महत्त्व प्राप्त झाले आहे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण यांनी केले. या योग शिबिरासाठी मार्गदर्शक म्हणून योगशिक्षक श्री. राजेंद्र ताम्हणकर यांनी विविध योगासने, प्राणायम व सुर्यनमस्काराच्या प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. या प्रसंगी ५ महाराष्ट्र बटालियनचे हवालदार श्री. राजाराम मगदूम, लेप्ट. प्रशांत पाटील, डॉ. डी. के. वळवी, प्रबंधक श्री. रवींद्र भोसले, अधिक्षक श्री. मनिष भोसले व महाविद्यालयातील प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व एन.सी.सी. कॅडेटस् मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## संपादकीय....

'शहाजी वार्ता'चा दुसरा अंक विद्यार्थी-पालक, प्राध्यापकांसह प्रशासकीय कर्मचाऱ्यांच्या हाती देताना विशेष आनंद होत आहे. सदर अंकामध्ये एप्रिल, मे आणि जून महिन्यामधील महाविद्यालयातील विविध उल्लेखनीय बाबींचा उहापोह केलेला आहे. महाविद्यालयाचे अकरावी निकाल, बारावी परीक्षेतील यश त्याचबरोबर शिवाजी विद्यापीठ स्तरावरील बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी. व आजीवन अध्ययन कोर्सेसमधील सुयश इत्यादीची आवर्जून नोंद घेतली आहे. महाविद्यालयातील आजी-माजी प्राध्यापक आणि माजी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या विविध शाखांच्या विषयवार सर्वोत्तम येणाऱ्या गुणवंत विद्यार्थी पारितोषिक योजनेअंतर्गत भरघोस स्वरूपात रक्कम ठेव म्हणून ठेवली आहे, ही गोष्ट विशेष उल्लेखनीय आहे. तसेच महाविद्यालयामध्ये नव्याने सुरू करण्यात आलेल्या विविध अभ्यासक्रमांची माहिती व विविध उपक्रम इत्यादीचा आढावा सदर अंकामध्ये घेतलेला आहे. या अंकात गुणवंत विद्यार्थ्यांच्या उल्लेखनीय नोंदी त्यांच्या छायाचित्रासह प्रसिद्ध केल्या असून त्यामुळे चालू शैक्षणिक वर्षात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसमोर आदर्श निर्माण होईल अशी आमची धारणा आहे.



## डॉ. मकरंद ऐतवडे यांची आकाशवाणीवर व्याख्यानमाला

वनस्पतीशास्त्र विषयाचे डॉ. मकरंद ऐतवडे यांचे कोल्हापूर आकाशवाणी केंद्रावरून दि. १ ते ३१ मे २०१८ या कालावधीत 'विज्ञान जगत' या कार्यक्रमात रोज सकाळी ८.४० वा. 'वनस्पती वर्गीकरण शास्त्राचे महत्त्व आणि उपयुक्तता' व 'वनस्पतींच्या कुलाविषयींची माहिती' या विषयांवरील व्याख्यानमाला प्रसारित झाली. यामध्ये त्यांनी वनस्पतीशास्त्राचे महत्त्व, वर्गीकरण, औषधी उपयोग, वनस्पती ओळखण्याचे शास्त्र याबरोबर द्विदल वनस्पती गटातील २७ वनस्पती कुटुंबाची शास्त्रीय माहिती दिली. सर्वांना वनस्पतीशास्त्राची ओळख करून देणारी अशी ही व्याख्यानमाला ठरलेली आहे.

## प्रा. काटकर यांनी शिक्षण, समाजकारण आणि राजकारणात वेगळा ठसा उमटविला - विजयराव बोंद्रे



प्रा. एकनाथ काटकर यांच्या सेवानिवृत्ती समारंभाप्रसंगी मानद सचिव मा. श्री. विजयराव बोंद्रे, माजी प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे, प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण, सौ. काटकर व डॉ. सौ. सुनिता राठोड

महाविद्यालयातील कॉमर्स विभागाचे विभाग प्रमुख, ज्येष्ठ प्राध्यापक व माजी प्रभारी प्राचार्य एकनाथ राऊ काटकर दि. ३० मे २०१८ रोजी प्रदिर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाले. त्यांच्या सेवानिवृत्ती निमित्तचा सत्कार संस्थेचे मानद सचिव श्री. विजयराव बोंद्रे (बापू) यांच्या हस्ते करण्यात आला. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. प्रा. एकनाथ काटकर यांनी श्री शहाजी महाविद्यालयात कॉमर्स विभागाचे प्राध्यापक, विभाग प्रमुख व प्रभारी प्राचार्य म्हणून यशस्वीपणे कार्य केले. या प्रसंगी प्रा. काटकर यांनी समाजकारण व राजकारणात आपल्या कामाची छाप उठविल्याचे प्रतिपादन श्री. विजयराव बोंद्रे यांनी केले. प्राचार्य डॉ. शानेदिवाण यांनी प्रा. काटकर यांच्या एकूण सेवाकाळातील कार्याचा आढावा घेतला. याप्रसंगी डॉ. एच. एस. वनमोरे, डॉ. सौ. सुनिता राठोड, प्रा. बी. बी. पाटील, डॉ. पांडुरंग पाटील, डॉ. राहुल मांडणीकर, डॉ. एम. ए. शिंदे, डॉ. विजय देठे यांनी प्रा. काटकर यांच्याविषयी मनोगते व्यक्त केली.

## ग्रामीण भागातील शौचालयाची सुविधा - सर्वेक्षण संशोधनाला स्व. सुषमा बाळासाहेब कडोलकर स्मृती संशोधन पारितोषिक



ग्रामीण भागातील शौचालय सुविधा सर्वेक्षण करताना विद्यार्थी

श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयातील बी.ए. भाग-२ च्या विद्यार्थ्यांनी ग्रामीण भागातील शौचालय सुविधा सर्वेक्षण केले. त्यामध्ये हणबरवाडी, निटवडे, चव्हाणवाडी व आंबेवाडी या गावातील शौचालयाच्या सुविधेचे सर्वेक्षण झाले. शरद बागडी, सागर गोसावी, मोहन देवकाते या विद्यार्थ्यांनी अग्रणी महाविद्यालय योजनेअंतर्गत संशोधन प्रकल्पाचे सादरीकरण केले.

यामध्ये श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयाने प्रथम क्रमांक मिळवून स्व. सुषमा बाळासाहेब कडोलकर पारितोषिक व रु. ५,०००/- चे बक्षिस मिळविले. सौ. मधुरिमाराजे छत्रपती यांच्या हस्ते पारितोषिकाचे वितरण झाले. संस्थेचे चेअरमन मा. श्री. मानसिंग बोंद्रे, मानद सचिव मा. श्री. विजयराव बोंद्रे, प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण, ग्रंथपाल डॉ. पांडुरंग पाटील, पर्यावरण शिक्षिका प्रा. सौ. दिपा पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

## 'सी.बी.सी.एस. पॅटर्न' विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासाला चालना देणारा - डॉ. भारती पाटील



सी.बी.सी.एस. कार्यशाळेत मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. भारती पाटील व उपस्थित मान्यवर

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर व श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून सुरू केलेल्या सी.बी.सी.एस. पॅटर्न संबंधी प्राध्यापकांसाठीची कार्यशाळा दि. ३ जुलै २०१८ रोजी संपन्न झाली. या कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी प्रा. डॉ. भारती पाटील यांनी शिवाजी विद्यापीठाने नव्याने सुरू केलेल्या सी.बी.सी.एस. पॅटर्नचा विस्तृत आढावा घेत, त्याचे महत्त्व विषद केले व हा पॅटर्न विद्यार्थी विकासाला चालना देणारा आहे, असे प्रतिपादन केले. सदर कार्यशाळेमध्ये प्रा. डॉ. भरत नाईक यांनी कला शाखेच्या सी.बी.सी.एस. पॅटर्नची सविस्तर माहिती त्यांच्या व्याख्यानामधून दिली. डॉ. अवनीश पाटील यांनी कार्यशाळेमध्ये सहभागी प्राध्यापकांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना उत्तरे दिली. डॉ. सुरेश शिखरे यांनी स्वागत व प्रास्ताविक प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण यांनी केले. तर आभार डॉ. आर. डी. मांडणीकर यांनी मानले. कार्यशाळेमध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातील ९६ प्राध्यापकांनी सहभाग नोंदविला. प्रा. आर. एम. कांबळे, डॉ. विजय देठे, डॉ. पांडुरंग पाटील, प्रा. प्रशांत पाटील, अधिक्षक श्री. मनिष भोसले यांनी कार्यशाळेचे संयोजन केले.

## जागतिक पर्यावरण दिन प्रबोधन रॅली



रॅलीत सहभागी मान्यवर..... प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण, जायंटस् ग्रुपचे अध्यक्ष डॉ. महादेव शिंदे, लेफ्ट. प्रशांत पाटील, प्रबंधक श्री. रवींद्र भोसले, अधिक्षक श्री. मनिष भोसले

श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेच्या, श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयाच्या एन.सी.सी. विभाग, ५ महाराष्ट्र बटालियन व जायंटस् ग्रुप, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार दि ५ जून २०१८ रोजी 'जागतिक पर्यावरण दिना'निमित्त प्रबोधन रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. कोल्हापूर शहराच्या मुख्य भागातून विविध प्रबोधनपर फलकांसह 'प्लॅस्टिक बंदी-पर्यावरण वाचवा' यासारख्या उद्बोधक घोषणा देऊन लोकांचे प्रबोधन करण्यात आले. या रॅलीमध्ये प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण, ५ महाराष्ट्र बटालियनचे हवालदार श्री. राजाराम मगदूम, जायंटस् ग्रुप ऑफ कोल्हापूरचे अध्यक्ष डॉ. महादेव शिंदे, लेफ्ट. प्रशांत पाटील, डॉ. एन. एस. जाधव, प्रबंधक रवींद्र भोसले, अधिक्षक मनिष भोसले व प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व एन.सी.सी. कॅडेटस् उपस्थित होते.

## प्लेसमेंट सेल मार्फत 'जॉब फेअर'चे आयोजन



जॉब फेअर प्रसंगी मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण

कोल्हापूर दि. २० जून : प्लेसमेंट सेल, श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय व किरण एंटरप्रायझेस यांच्या संयुक्त विद्यमाने 'जॉब फेअर'चे आयोजन करण्यात आले. या जॉब फेअरमध्ये 'टॅली' अकौंटींग सॉफ्टवेअर, सेल्स ॲण्ड सर्व्हीस इत्यादी वेगवेगळ्या पदांसाठी भरती प्रक्रिया राबविण्यात आली. यामध्ये महाविद्यालयातील ३३ विद्यार्थी व ६ टॅली बिझनेस पार्टनर यांनी सहभाग घेतला. सर्व प्रक्रियेमधून ३० विद्यार्थ्यांची पुढील फेरीसाठी निवड झाली. जॉब फेअरचे उद्घाटन प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण यांनी केले. या प्रसंगी आय.क्यु.ए.सी. समन्वयक डॉ. एन. एस. जाधव उपस्थित होते. जॉब फेअरचे आयोजन प्लेसमेंट सेल प्रमुख प्रा. संतोष कांबळे व किरण एंटरप्रायझेसचे श्री. विक्रम पाटील यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. संतोष कांबळे व आभार प्रा. विशाल पुंदीकर यांनी मानले.



जागतिक योग दिनानिमित्त योगाभ्यासामधील सहभागी

## जागतिक योग दिन उत्साहात संपन्न

श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, जायंटस् ग्रुप ऑफ कोल्हापूर व योग विद्याधाम यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात 'आंतरराष्ट्रीय योग दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या योग दिनामध्ये महाविद्यालयातील प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी, जायंटस् ग्रुपचे अध्यक्ष डॉ. एम. ए. शिंदे, डॉ. प्रमिला जरग, श्री. श्रीकांत माजगावकर व एन.सी.सी. कॅडेटस् यांनी सहभाग घेतला. यासाठी योग शिक्षक श्री. रवींद्र ताम्हणकर यांनी प्रात्यक्षिकासह योगासन, प्राणायाम, ध्यान व धारणा यांचे महत्त्व सांगितले. या योग दिनाचे संयोजन शारीरिक शिक्षण संचालक प्रा. प्रशांत पाटील यांनी केले.

## माजी विद्यार्थ्यांचे घवघवीत यश



निलम पाटील

✲ कु. निलम महादेव पाटील : या इंग्रजी विभागाच्या माजी विद्यार्थीनीची महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात आलेल्या पी.एस.आय. परीक्षेत १८ व्या क्रमांकाने उत्तीर्ण होऊन निवड झाली.



सुधीर पोवार

✲ कु. सुधीर कृष्णात पोवार : हा भूगोल विभागाचा माजी विद्यार्थी असून त्याने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्या वतीने घेण्यात आलेल्या भूगोल विषयातील सन २०१८ मधील सेट परीक्षेत यश संपादन केले.



## डॉ. वनमोरे यांचे कामाप्रती असणारे समर्पण, बांधिलकी, निष्ठा प्रेरणादायी

– डॉ. आर. के. शानेदिवाण

महाविद्यालयातील भूगोल विभागाचे विभाग प्रमुख, ज्येष्ठ प्राध्यापक व माजी प्रभारी प्राचार्य डॉ. एच. एस. वनमोरे दि. ३० जून २०१८ रोजी प्रदिर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाले. त्यांच्या सेवानिवृत्ती निमित्तचा सत्कार प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण यांच्या हस्ते करण्यात आला. डॉ. वनमोरे यांनी श्री शहाजी महाविद्यालयात भूगोल विभागाचे विभाग प्रमुख, प्रभारी प्राचार्य व शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे समन्वयक म्हणून दोन वर्षेयशस्वी कामकाज पाहिलेले आहे. प्राचार्य डॉ. शानेदिवाण यांनी डॉ. वनमोरे यांच्याबद्दल गौरवोद्गार काढताना, डॉ. वनमोरे याचे कामाप्रती असणारे समर्पण, बांधिलकी, निष्ठा आम्हाला नेहमीच प्रेरणा व प्रोत्साहन देत राहील. आपण शिक्षक म्हणून आदर्श ठरलातच, पण तुमच्यातील माणूस अधिक प्रामाणिक, सजग आहे. आम्हाला आपल्यासोबत दिर्घकाळ काम करता आले याचा आनंद वाटतो असे गौरवोद्गार काढले. या प्रसंगी सर्व प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी उपस्थित होते.



शिवाजी कारंडे



प्रदीप तानुगडे



कु. अलमास बारगीर



निरज अंबपकर

## श्रीपतराव बोंद्रे (दादा) स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे उज्ज्वल यश !

महाविद्यालयाच्या वतीने श्रीपतराव बोंद्रे (दादा) स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र सुरू आहे. या केंद्राच्या माध्यमातून पदवी स्तरावरील विद्यार्थ्यांची स्पर्धा परीक्षेसाठीची पायाभूत स्वरूपाची तयारी करून घेतली जाते. या केंद्रात माफक शुल्कामध्ये तज्ज्ञ मार्गदर्शकांकडून वर्षभर विविध विषयांची तयारी करून घेतली जाते. मार्च ते जून २०१८ या कालावधीत केंद्राच्या पुढील विद्यार्थ्यांनी उज्ज्वल यश संपादन केले. १) श्री. शिवाजी कृष्णात कारंडे - महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ - कनिष्ठ तंत्रज्ञपदी निवड. २) श्री. प्रदिप संभाजी तानुगडे - महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ - वरिष्ठ लेखनिकपदी निवड. ३) कु. अलमास अस्लम बारगीर - रेल्वे पोलिस, मुंबई - रेल्वे पोलिसपदी निवड. ४) कु. निरज उदय अंबपकर - राज्य राखीव पोलिस, महाराष्ट्र. अधिक माहितीसाठी केंद्र संचालक डॉ. विजय देठे (मो.नं. ९०११६४८९८७) यांचेशी संपर्क साधवा.

## तृतीय वर्ष कला, वाणिज्य व विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील कला, वाणिज्य व विज्ञान शाखेच्या तृतीय वर्षातील विविध विभागाच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले. त्यांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण, माजी प्रभारी प्राचार्य प्रा. एकनाथ काटकर, प्रा. डॉ. एच. एस. वनमोरे व कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील सर्व प्राध्यापकांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. विषयात प्रथम आलेले विद्यार्थी.....



पूनम कांबळे
बी.ए. भाग-३
मराठी ८६%



निलोफर सनदे
बी.ए. भाग-३
हिंदी ७५%



कोमल गायकवाड
बी.ए. भाग-३
इंग्रजी ७२.७०%



संकेत गायकवाड
बी.ए. भाग-३
इतिहास ८५.०४%



कोमल माने
बी.ए. भाग-३
राज्यशास्त्र ८२.६६%



सारिका मोरे
बी.ए. भाग-३
समाजशास्त्र८५.६०%



प्रणय काशिद-पाटील
बी.ए. भाग-३
अर्थशास्त्र ८६%



ज्ञानेश्वर वाघमोडे
बी.ए. भाग-३
भूगोल ८६%



सारिका डफडे
बी.कॉम. भाग-३
वाणिज्य ७७.१६%



उत्कर्षा कामत
बी.एस्सी. भाग-३
संख्याशास्त्र ९२.३३%



स्वाती पंडुरकर
बी.एस्सी. भाग-३
गणितशास्त्र ९२.३३%



प्रियंका पाटील
बी.एस्सी. भाग-३
प्राणीशास्त्र ८१.३७%



वैशाली संकपाळ
बी.एस्सी. भाग-३
रसायनशास्त्र ७५.८३%



शुभांगी नगारे
बी.सी.ए. भाग-३
७४.५८%



अमृता वंडकर
बी.सी.ए. भाग-३
७२.७५%



निशिगंधा काशिद
बी.सी.ए. भाग-३
७०.२८%

## शिवाजी विद्यापीठ, आजीवन अध्ययन व विस्तार विकास कोर्सेसमध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे सुयश

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर अंतर्गत, आजीवन अध्ययन व विस्तार विकास विभागाच्या विविध प्रमाणपत्र व पदवीका अभ्यासक्रमात श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयातील विविध विभागांच्या विद्यार्थ्यांनी चांगल्या गुणांनी यश संपादन केले. या विद्यार्थ्यांना प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण, डॉ. डी. के. वळवी, डॉ. डी. एल. काशिद-पाटील, डॉ. सौ. एस. एस. पाटील, प्रा. प्रशांत पाटील, डॉ. शिवाजी जाधव, डॉ. आर. डी. मांडणीकर, प्रा. के. एम. देसाई, डॉ. मकरंद ऐतवडे यांचे मार्गदर्शन लाभले.

| | कोर्स | विभाग | विद्यार्थ्यांचे नांव | टक्के |
|---|---|---|---|---|
| १. | 'ग्रामीण पत्रकारिता आणि जनसंवाद' | मराठी | कु. आलम मुबारक डांगे | ५३.२५ |
| २. | 'ट्रॅव्हल ॲण्ड टुरिझम' | भूगोल | कु. दिपाली शिवाजी माळी | ८८.२५ |
| ३. | 'हिंदी अनुवाद' | हिंदी | कु. आफ्रिन चाँदसो पठाण | ८१.०० |
| ४. | 'प्राथमिक योग' | क्रीडा | कु. महेश शहाजी सुर्यवंशी | ६९.०० |
| ५. | मोडी लिपी | इतिहास | कु. विशाल व्यंकट कांबळे | ७२.०० |
| ६. | पंचायत राज | राज्यशास्त्र | कु. साधना मारूती दावणे | ८२.८६ |
| ७. | सुगंधी व औषधी वनस्पती : ओळख व संवर्धन | वनस्पतीशास्त्र | कु. तृप्ती बाजीराव पडवळ | ९२.०० |
| | | | कु. उर्मिला दिनकर लोंढे | ९२.०० |

## माजी विद्यार्थ्यांकडून गुणवंत विद्यार्थ्यांसाठी पारितोषिक योजना

श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेच्या श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयातील माजी विद्यार्थ्यांनी चालू शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून वरिष्ठ व कनिष्ठ विभागातील विविध विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांना दरवर्षी स्मृती पारितोषिके व प्रोत्साहनपर पारितोषिक जाहिर केलेली आहेत. या पारितोषिकांच्या माध्यमातून विविध विषयांच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी प्रोत्साहन मिळणार आहे.

▶ कै. पांडुरंग धोंडीराम चौगले स्मृती पारितोषिक (ठेव रु. ५,०००)
**प्रा. एस. पी. चौगले यांचेकडून**
- बी.ए. भाग-३ स्पेशल इंग्रजी विषयात सर्वप्रथम

▶ कै. नारायण ज्ञानोबा जाधव-कसबेकर स्मृती पारितोषिक (ठेव रु. ५,०००)
**श्री. राजेंद्र नारायण जाधव-कसबेकर यांचेकडून**
- बी.एस्सी.-३ गणितशास्त्र विषयात सर्वप्रथम

▶ कै. भगवानराव कृष्णाजी शेळके स्मृती पारितोषिक (ठेव रु. ५,०००)
**प्रा. अमरसिंह भगवानराव शेळके यांचेकडून**
- इ. १२ वी भूगोल विषयात प्रथम

▶ कै. पंडितराव दौलतराव पाटील स्मृती पारितोषिक (ठेव रु. १०,०७५)
**श्री. बाबासाहेब पाटील आसुर्लेकर यांचेकडून**
- बी.एस्सी. व बी.सी.ए. सर्वप्रथम

▶ कै. श्रीमती आनंदी विश्वंभर उरूणकर स्मृती पारितोषिक (ठेव रु. ५,०००)
**प्रा. कु. वैजयंती विश्वंभर उरूणकर यांचेकडून**
- इ. १२ वी कला राज्यशास्त्र विषयात सर्वप्रथम

▶ कै. दत्तात्रय बापूराव राऊत स्मृती पारितोषिक (ठेव रु. ५,०००)
**सौ. नूतन बापूराव राऊत यांचेकडून**
- तृतीय वर्ष - वाणिज्य - लॉ - प्रथम क्रमांक

▶ कै. शकुन सुधाकर मानकर स्मृती पारितोषिक (ठेव रु. ५,०००)
**प्रा. डॉ. सौ. निता धनंजय काशिद-पाटील यांचेकडून**
- तृतीय वर्ष कला भूगोल विषयात सर्वप्रथम

▶ कै. महिपतराव सिताराम पाटील स्मृती पारितोषिक (ठेव रु. ५,०००)
**डॉ. सौ. अरुंधती दीपक पाटील यांचेकडून**
- इ. १२ वी कला - भूगोल विषयात सर्वप्रथम

▶ कै. केरबा कृष्णा पाटील स्मृती पारितोषिक (ठेव रु. ५,०००)
**प्रा. पंढरीनाथ केरबा पाटील यांचेकडून**
- इ. १२ वी कला - मराठी विषयात सर्वप्रथम

▶ डॉ. धनंजय लहूजीराव काशिद-पाटील प्रोत्साहन पारितोषिक (ठेव रु. ५,०००)
द्वितीय वर्ष कला भूगोल विषयात सर्वप्रथम

▶ प्रा. मुकुंद नामदेवराव कांबळे प्रोत्साहन पारितोषिक (ठेव रु. ५,०००)
इ. १२ वी कला शाखेत इंग्रजी विषयात सर्वप्रथम

▶ प्रा. सुनिल हिंदुराव घोडके प्रोत्साहन पारितोषिक (ठेव रु. ५,०००)
इ. १२ वी वाणिज्य शाखेत इंग्रजी विषयात सर्वप्रथम

## आजी-माजी प्राध्यापकांकडून गुणवंत विद्यार्थी पारितोषिक योजना

पारितोषिके *(Prizes)* :

- कै. प्रा. के. एच. ठक्कर स्मृती पारितोषिक (ठेव रु. १४,०००)
  १) बी.ए. आणि बी.कॉम. भाग-३ अर्थशास्त्र विषयात सर्वप्रथम
  २) बी.ए. आणि बी.कॉम. भाग-३ मध्ये सर्वप्रथम
- कै. डॉ. एन. आर. थोरात स्मृती पारितोषिक (ठेव रु. ४२,०००)
  १) बी.ए. भाग-३ इंग्रजी विषयात सर्वप्रथम
  २) बी.कॉम. भाग-३ अकौंटन्सी विषयात सर्वप्रथम
  ३) बी.ए. भाग-३ समाजशास्त्र विषयात सर्वप्रथम
- कै. पी. टी. देशमुख स्मृती पारितोषिक (ठेव रु. २,०००)
  १) इ. १२ वी इंग्रजी विषयात सर्वप्रथम
- कै. सौ. चंद्राबाई पांडुरंग शिंदे स्मृती पारितोषिक (ठेव रु. २,०००)
  १) इ. १२ वी परीक्षेत सर्वप्रथम
- कै. यशवंत रामजी बेडेकर स्मृती पारितोषिक (ठेव रु. ५,०००)
  १) इ. १२ वी वाणिज्य शाखेत सर्वप्रथम
- कै. सौ. सुषमा बाळासाहेब कडोलकर स्मृती पारितोषिक (ठेव रु. १०,०००)
  १) बी.एस्सी. भाग-३ - वनस्पतीशास्त्र विषयात सर्वप्रथम
  २) बी.एस्सी. भाग-३ - प्राणीशास्त्र विषयात सर्वप्रथम
- कै. श्रीमती लक्ष्मीबाई राऊसो काटकर स्मृती पारितोषिक (ठेव रु. ५,०००)
  प्रा. एकनाथ राऊ काटकर, माजी प्रभारी प्राचार्य यांचेकडून
  १) बी.कॉम. भाग-३ - बँकींग विषयात सर्वप्रथम
- कै. सौ. सखुबाई राजाराम कांबळे व कै. श्री. राजाराम लखू कांबळे स्मृती पारितोषिक(ठेव रु. १०,०००)
  १) बी.ए. भाग-३ - हिंदी विषयात सर्वप्रथम
- कै. जयवंतराव द. भोसले स्मृती पारितोषिक (ठेव रु. ५,०००)
  श्री. रवींद्र जयवंतराव भोसले यांचेकडून
  १) बी.एस्सी. भाग-३ - रसायनशास्त्र विषयात सर्वप्रथम
- कै. शांताबाई मानकर स्मृती पारितोषिक (ठेव रु. १२,५००)
  १) बी.कॉम. भाग-३ सर्वप्रथम
- कै. सदाशिवराव मानकर स्मृती पारितोषिक (ठेव रु. १२,५००)
  १) एम.कॉम. भाग-१ सर्वप्रथम. प्रा. सुधाकर सदाशिवराव मानकर यांचेकडून
- कै. भाऊसाहेब पंगु वकील स्मृती पारितोषिक (ठेव रु. ६,४००)
  १) बी.ए. भाग-३ इंग्रजी (ऐच्छिक) विषयात सर्वप्रथम
  प्रा. दिलीप नारायण पंगू, माजी विभाग प्रमुख, इंग्रजी यांचेकडून

## यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे विविध अभ्यासक्रम

✻ **एम.बी.ए. :** महाविद्यालयामध्ये सन २०११-१२ पासून यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांचा एम.बी.ए. अभ्यासक्रम सुरू आहे. या पदवीसाठी कोणत्याही विद्याशाखेचा विद्यार्थी प्रवेश घेऊ शकतो. नोकरी व व्यवसाय करत दूरशिक्षण पद्धतीने हा अभ्यासक्रम विद्यार्थी पूर्ण करू शकतो हे याचे वैशिष्ट्य आहे.

✻ **एम.सी.ए. :** महाविद्यालयामध्ये चालू शैक्षणिक वर्ष सन २०१८-१९ पासून यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांचा एम.सी.ए. अभ्यासक्रम सुरू करण्यात आलेला आहे. यासाठी कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाचा बी.सी.ए., बी.सी.एस., बी.एस्सी. संगणक पदवी प्राप्त विद्यार्थी प्रवेश घेऊ शकतो. एम.बी.ए. व एम.सी.ए. अभ्यासक्रमासंबंधीत डॉ. महादेव शिंदे यांचेशी संपर्क साधावा (मो.नं. ९३७११८१८८५)

**✻ नोकरी-व्यवसाय करणाऱ्यांसाठी सुवर्णसंधी. ✻ प्रत्येक शनिवार व रविवारी समंत्रकांचे मार्गदर्शन. ✻ अनुभव व तज्ज्ञ मार्गदर्शक.**

✻ **बी.सी.ए. विभाग :** महाविद्यालयामध्ये विज्ञान विभागातंर्गत शिवाजी विद्यापीठाचा **(Bachelor of Computer Application-BCA)** तीन वर्षाचा पदवी अभ्यासक्रम २००८ पासून सुरू असून सन २०१८-१९ करिता प्रवेश सुरू आहेत. अधिक माहितीसाठी प्रा. सौ. स्वाती पाटील (९१७५३८२१२६) व प्रा. श्री. विशाल पुंदीकर (९७६२७६५०४८) यांचेशी संपर्क साधावा.

## बी.सी.ए. - कोर्स प्रवेश सुरु २०१८-१९

**✻ आमची ठळक वैशिष्ट्ये ✻**

- अनुभवी प्राध्यापक वर्ग,
- सुसज्ज कॉम्प्युटर लॅबोरेटरी,
- समृध्द ग्रंथालय,
- भरपूर प्रॅक्टिकल्स व टेस्टस,
- अभ्यासपूरक कार्यक्रम,



- इंटरनेट,
- एल.सी.डी.,
- प्रोजेक्टरयुक्त हायटेक वर्ग,
- गुणवंत विद्यार्थ्यांना खास प्रोत्साहन,
- प्लेसमेंट सहकार्य

## एस.सी. विद्यार्थ्यांना सरकारी नियमानुसार संपूर्ण फी परत

### कनिष्ठ विभाग इ. ११ वी कला-वाणिज्य निकाल

इ. ११ वी कला व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांचा सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षाचा निकाल परीक्षा समिती मार्फत दि. २५.०४.१८ रोजी जाहीर करण्यात आला. त्यामध्ये खालील विद्यार्थ्यांनी यश संपादन केले.

**✻ कला शाखा ✻**

| | विद्यार्थ्यांचे नांव | टक्केवारी |
|---|---|---|
| १. | कु. शेवाळे प्रज्ञा सौदागर | ७२.९२ |
| २. | कु. पोवार नलिनी उर्फ मोहिनी लक्ष्मण | ७२.३० |
| ३. | कु. पाटील ऋतुजा राजाराम | ६७.८४ |
| ४. | कु. कोळी श्रेयश पांडुरंग | ६६.६१ |
| ५. | कु. माने अश्विनी अमर | ६६.१५ |

**✻ वाणिज्य शाखा ✻**

| | विद्यार्थ्यांचे नांव | टक्केवारी |
|---|---|---|
| १. | कु. लाड प्रतिज्ञा विश्राम | ८०.१५ |
| २. | कु. घोडके कृतिका खंडेराव | ७७.६९ |
| ३. | कु. कांबळे उज्वल विलास | ७६.३० |
| ४. | कु. नरके सुश्मिता विलास | ७६.०० |
| ५. | कु. कासोटे ऋषिकेश दगडू | ७४.१५ |

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा महाविद्यालयाच्यावतीने पुष्पगुच्छ व इंग्रजी शब्दकोश देऊन सत्कार करण्यात आला.

### इ. ११ वी केंद्रिय प्रवेश समिती मुख्य कार्यालय श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय

कोल्हापूर शहरामध्ये गतवर्षीप्रमाणे यंदाच्या सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षासाठी इ. ११ वी प्रवेश प्रक्रिया केंद्रिय पद्धतीनेच राबविली जाणार आहे. गेल्या वर्षापर्यंत श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयात केंद्रिय प्रवेश समितीचे अर्ज संकलन केंद्र होते. या वर्षी प्रथमच समिती कामकाजाचे मुख्य कार्यालय म्हणून श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय असून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण समितीचे अध्यक्ष म्हणून काम पाहणार आहेत. या संदर्भातील बैठक महाविद्यालयामध्ये दि. ७ जून २०१८ रोजी पार पडली. या सभेसाठी मा. शिक्षण उपसंचालक मा. श्री. किरण लोहारसो, सहसंचालक मा. श्री. चौगुले, शिक्षण निरीक्षक मा. श्री. चेतन शिंदे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण, शहरातील ३३ कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य, प्रतिनिधी उपस्थित होते.



शाहू जयंती निमित्त श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेचा सजीव देखावा.



शाहू जयंतीनिमित्त आयोजित शोभायात्रेचा समारोप करताना प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण व उपस्थित मान्यवर

## राजर्षी शाहू महाराज जयंती शोभायात्रा

राजर्षी शाहू महाराज यांच्या १४४ व्या जयंतीनिमित्त महाविद्यालयामध्ये विविध उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये शाहू महाराजांच्या जीवनकार्यावर आधारित चित्ररथ तयार करण्यात आला होता. या चित्ररथाचे उद्घाटन कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. चंद्रकांतदादा पाटील, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. देवानंद शिंदे, मानद सचिव मा. श्री. विजयराव बोंद्रे, प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे, प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या चित्ररथाचे संयोजन इतिहास विभागाचे प्रा. एस. डी. अपराध व श्री. सागर चरापले यांनी केले.

**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे आजीवन अध्ययन व विस्तार विकास विभागाच्या सन २०१८-१९ करिता खालील कोर्ससला प्रवेश सुरू आहेत**

| कोर्स | विभाग | समन्वयक | मो.नं. |
|---|---|---|---|
| १. 'ग्रामीण पत्रकारिता आणि जनसंवाद' | मराठी | डॉ. डी. के. वळवी | ९४२०१३५१७० |
| २. 'ट्रॅव्हल ॲण्ड टुरिझम' | भूगोल | डॉ. डी. एल. काशिद-पाटील | ८६०५१२७३७३ |
| ३. 'हिंदी अनुवाद' | हिंदी | डॉ. सौ. एस. एस. पाटील | ९९२२७७०६६१ |
| ४. 'प्राथमिक योग' | क्रीडा | प्रा. पी. बी. पाटील | ९८२२२४४२०२ |
| ५. मोडी लिपी | इतिहास | डॉ. एस. डी. जाधव | ९९७५५०६७५५ |
| ६. पंचायत राज | राज्यशास्त्र | डॉ. आर. डी. मांडणीकर | ९८८१५७८७८२ |
| ७. समाजकार्य शिक्षण | समाजशास्त्र | प्रा. के. एम. देसाई | ८४८५८५९२२२ |
| ८. सुगंधी व औषधी वनस्पती : ओळख व संवर्धन | वनस्पतीशास्त्र | डॉ. एम. एम. ऐतवडे | ८२०४८३७८३९ |


**✻ संपादक मंडळ ✻**

• संपादक •

प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण

• कार्यकारी संपादक •

डॉ. सुरेश शिखरे

• सहसंपादक •

डॉ. पी. बी. पाटील    प्रा. पी. के. पाटील

• सदस्य •

प्रा. एस. एच. कांबळे    प्रा. पी. बी. पाटील

डॉ. एम. एम. ऐतवडे    प्रा. व्ही. एच. पुंदीकर

श्री. आर. जे. भोसले


## इ. बारावी निकालामध्ये शहाजी महाविद्यालयाचे भरघोस यश



**आकाश रावळ**
१२ वी कला शाखा सर्वप्रथम
७२.४०% गुण



**शिवानी जाधव**
१२ वी वाणिज्य शाखा सर्वप्रथम
७३.३८% गुण

### बारावी कला शाखा



**किरण पाटील**
मानसशास्त्र ८७ गुण



**नितीन भंगेपुजारी**
समाजशास्त्र ८४ गुण



**अभिषेक मस्के**
राज्यशास्त्र ८० गुण



**आकाश रावळ**
भूगोल ७५ गुण

### बारावी वाणिज्य शाखा



**महेश चव्हाण**
अकौंटन्सी ८३ गुण



**सीमा पुंदीकर**
अर्थशास्त्र ९० गुण



**सावली मिसाळ**
समाजशास्त्र ८९ गुण



**तनुजा गराटे**
अकौंटन्सी ८६ गुण

दि. १२ जून २०१८ रोजी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळ, पुणे यांच्यामार्फत इ. १२ वी च्या सर्व शाखांचा निकाल घोषित करण्यात आला. सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षामध्ये इ. १२ वी कला शाखेचा निकाल ५४.९४% तर वाणिज्य शाखेचा निकाल ८७.६% इतका लागला. या विद्यार्थ्यांना प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण, कनिष्ठ विभागाचे पर्यवेक्षक श्री. बाजीराव पाटील, प्रबंधक रवींद्र भोसले, अधिक्षक मनिष भोसले, लिपिक एस. आर. पाटील व सर्व शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.



प्रा. एम. टी. सुर्यवंशी

### भावपूर्ण श्रद्धांजली !

कनिष्ठ विभागातील मराठी विषयाचे माजी अध्यापक एम. टी. सुर्यवंशी यांचे दि. १६/६/२०१८ रोजी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. दि. २ जुलै १९८४ पासून श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयात कार्यरत असलेले सुर्यवंशीसर जवळ जवळ २४ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर दि. ३१ ऑक्टोबर २००८ रोजी सेवानिवृत्त झाले होते. संस्था, महाविद्यालय, सर्व शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी, विद्यार्थी यांच्यावतीने कै. सुर्यवंशी सरांना भावपूर्ण श्रद्धांजली !

✻ 'शहाजी बुलेटिन' या त्रैमासिकाचे प्रकाशन श्री छत्रपती शहाजी महाविद्यालय, कोल्हापूर येथून करण्यात आले. ✻ 'शहाजी बुलेटिन'या त्रैमासिक अंकातील मजकुराशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.
✻ फक्त खासगी वितरणासाठी. वर्ष : पहिले, त्रैमासिक अंक दुसरा (एप्रिल/मे/जून २०१८) ✻ मुद्रक : प्रज्ञा प्रिंटिंग प्रेस, कोल्हापूर.